**भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत**
**ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प**
**उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ. जि. सिंधुदुर्ग**
**विशेष कृषी सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग**
**कालावधी ;दिनांक ०२.०६-२०२० ते ०५.०६.२०२०.**

# "निसर्ग"या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान आधारित विशेष कृषी सल्ला पत्रक

**पूर्व मध्य अरबी समुद्रातील निसर्ग या चक्रीवादळाचे स्थान व स्थिती**

सिंधुदूर्ग जिल्हा व दक्षिण महाराष्ट्रासाठी चक्रीवादळाचा इशारा :-

दक्षिण आग्नेय आणि पूर्व मध्य अरबी समुद्रात अत्यंत कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होवुन त्याचे निसर्ग या चक्रीवादळात रूपांतर झाले असून ते ११ कि. मी. प्रतितास या वेगाने उत्तरेकडे सरकत आहे. तसेच निसर्ग या चक्रीवादळाचे स्थान १५.६° उत्तर अक्षवृत्त व ७१.२° पूर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान असून दि ०३ जून २०२० रोजी त्याचे तीव्र अश्या चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या चक्रीवादळाचे स्थान पणजी पासून २८० कि.मी. पश्चिमोत्तर ईशान्येस. मुबई पासून ४३० कि. मी. दक्षिणौत्तर नैऋत्येस व सुरत पासुन ६४० कि.मी. दक्षिणौत्तर नैऋत्येस आहे.

## सिंधुदूर्ग जिल्हयासाठी चक्रीवादळ पूर्वानुमान आणि इशारा :-

| जिल्हा | तीव्रता व शक्यता | २ जून २०२० मंगळवार | ३ जून २०२० बुधवार | ४ जुने २०२० गुरुवार | ५ जुने २०२० शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|
| सिंधुदूर्ग | तीव्रता | गडगडाटी वादळ सोसाटयाचा वारा व मेघ गर्जनेसह तुरळक ठिकाणी बहुतेक अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. | गडगडाटी वादळ सोसाटयाचा वारा व मेघ गर्जनेसह तुरळक ठिकाणी बहुतेक अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. | तुरळक ठिकाणी बहुतेक मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. | तुरळक ठिकाणी बहुतेक मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | शक्यता | बहुतेक | बहुतेक | बहुतेक | कदाचित |

| सूची | कोणताही इशारा नाही. (कोणतीही कृती नाही) | पहा (अद्यावत रहा) | सावधान (तयारीत रहा) | इशारा (कृती करा) |
|---|---|---|---|---|

| अति हलक्या स्वरूपाचा पाऊस | हलक्या स्वरूपाचा पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार स्वरूपाचा पाऊस | अति मुसळधार स्वरूपाचा पाऊस | अत्यंत/ आस्मानी मुसळधार स्वरूपाचा पाऊस |
|---|---|---|---|---|---|
| २ ते ४ मि. मी. | २.५ ते १५.५ मि. मी. | १५.६ ते ६४. ६ मि. मी. | ६४.५ ते ११५.५ मि. मी. | ११५.६ ते २०४. ४ मि. मी. | २०४.४ मि. मी. |

| कदाचित/Likely | बहुतेक/Very Likely | बहुधा/ Most Likely |
|---|---|---|
| २६ ते ५० टक्के शक्यता | ५१ ते ७५ टक्के शक्यता | ७५ टक्के पेक्षा जास्त शक्यता |

सिंधुदूर्ग जिल्हयासाठी निसर्ग चक्रीवादळ परिस्थितीमुळे पाऊस व वाऱ्या संबंधी इशारा:

**१.** पर्जन्य:

- वरील प्रणालीच्या प्रभावाखाली महाराष्ट्र विषेषतः पष्चिम किनारपट्टीवर २ ते ४ जुन २०२० या काळात भरपूर पावसाची शक्यता आहे.
- २ आणि ३ जुनलाए दक्षिण कोकण आणि सिंधुदूर्ग येथे बहुतेक ठिकाणी गडगडाटी वादळ. सोसाटयाचा वारा व मेघ गर्जनेसह तुरळक ठिकाणी बहुतेक अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तर थोडया ठिकाणी अत्यंत मुसळधार तो आस्मानी मुसळधार (Heavy to very heavy with isolate extremely heavy falls) पाऊस पडण्याची षक्यता आहे.
- ३ आणि ४ जुनला उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील बहुतांष ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपात पाऊस असेल तर काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाची तर एखाया ठिकाणी तो आस्मानी मुसळधार असण्याची शक्यता वर्तवली आहे. (Heavy to very heavy with isolate extremely heavy falls very likely.)

२ वेगाच्या वाऱ्याचा इशारा:

- पुढील ४८ तासात दक्षिणपूर्व आणि लगतच्या मध्यमपूर्व अरबी समुद्र, गोवा व दक्षिण महाराष्ट्र तसेच सिंधुदूर्ग किनारपट्टीवर वादळी वाऱ्याचा वेग ८० ते ९० किमी प्रतितास तर कधी कधी तो १०० किमी प्रतितास पर्यंत सोसाटयाचा इतका असण्याची शक्यता आहे.
- ३ जून पासुन दक्षिण महाराष्ट्राच्या सीमेवर व पूर्वेकडील आणि ईशान्य दिशेला ११० किमी प्रतितास वेगाने वादळी वारे असतील आणि नंतर वेग वाढेल.

३). मच्छिमारांसाठी इशारा:

- सिंधुदूर्ग जिल्हयातील समुद्रातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये

४). कृषी सल्ल्ला:

| | | |
|---|---|---|
| भात | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे भात पीक पेरणीची कामे शक्यतो पुढे ढकलण्यात यावी<br>ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली आहे व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| नागली | पेरणी | अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे नागली पीक पेरणीची कामे शक्यतो पुढे ढकलण्यात यावी |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे जिल्ह्यात ज्या ठिकाणी आंबा काढणीची कामे राहिली असल्यास व फळे काढणी शक्य असल्यासच आंबा फळांची त्वरित काढणी करावी<br>अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे दिनांक ३ व ४ जून रोजी आंबा फळे काढणीची कामे शक्यतो पुढे ढकलावित त्याच बरोबर विजांच्या गडगडाटामध्ये शेतकऱ्यांनी स्वतः च्या जीविताची हानी होऊ नये म्हणून विशेष काळजी घ्यावी |
| काजु | नवीन लागवड | सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या काजु कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| नारळ | नवीन लागवड | सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार द्यावा.<br>अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी गडगडाटी वादळ मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे नारळ बागेतून पाण्याचा निचरा करावा |
| सुपारी | नवीन लागवड | सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या सुपारीच्या रोपांना काठीचा आधार द्यावा.<br>अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी गडगडाटी वादळ मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे सुपारी बागेतून पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे भाजीपाला पिकांच्या पेरणीची कामे शक्यतो पुढे ढकलण्यात यावी<br>अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी गडगडाटी वादळ मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे भाजीपाला रोपवाटिकेतून पाण्याचा निचरा करावा | |
| दूभती जनावरे / शेळ्या मेंढ्या | अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी गडगडाटी वादळ मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे विजांपासून बचावासाठी दूभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत | |
| कुक्कुटपालन | अरबी समुद्रातील निसर्ग चक्रीवादळामुळे दक्षिण कोंकण व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ जून रोजी गडगडाटी वादळ मेघगर्जनेसह अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्यामुळे पावसाच्या साडक्यापासून व सोसाट्याच्या वाऱ्यापासून पक्ष्यांचे संरक्षण करावे | |
| सागरी मासेमारी | अरबी समुद्रात चक्रीवादळ घोंगावत असून सुमुद्राची स्थिती खवळलेला आहे तरी सागरी मच्छिमारांनी दिनांक ४ जून पर्यंत समुद्रामध्ये मासेमारी करण्यासाठी जाणे टाळावे | |